# ज्ञानज्योती मा. प्राचार्य शुभांगी गावडे यांची जयंती "महिला नेतृत्व, सक्षमीकरण आणि सर्वसमावेशकता" या राष्ट्रीय परिसंवादाने संपन्न

डी. के. ए.एस. सी महाविद्यालय इचलकरंजी येथील अंतर्गत तक्रार निवारण समिती महिला सक्षमीकरण कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने "महिला नेतृत्व सक्षमीकरण आणि सर्वसमावेशकता" या विषयावरील राष्ट्रीय परिसंवाद संपन्न झाला. या राष्ट्रीय परिसंवादामध्ये उत्तर प्रदेश, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा या भारतातील विविध राज्यातून शिक्षण तज्ञ, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


या परिसंवादाचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अजीव सभासद मा. डॉ.श्रुती जोशी यांच्या हस्ते झाले. परिसंवादाच्या उद्घाटन प्रसंगी त्या म्हणाल्या सुरक्षितआणि सर्वसमावेशक शैक्षणिक संस्था, कार्यस्थळे आणि समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी संवादाला चालना देण  आणि परस्पर सहकार्याला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे यांनी परिसंवादाचा प्रमुख उद्देश स्पष्ट करत कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित सन्मानजनक आणि भेदभाव मुक्त वातावरण मिळणे हा केवळ कायदेशीर अधिकार नसून संस्थात्मक संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले.


या परिसंवादाच बीजभाषक मा. प्राचार्य डॉ. पूजा नरवाडकर, भारती विद्यापीठ न्यू कॉलेज, सांगली यांनी POSH कायद्याच्या माध्यमातून लिंग संवेदनशील संस्थांची निर्मिती या विषयावर आपले विचार मांडताना POSH कायदा, लैंगिक छळ आणि लैंगिक छळ रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि निवारणात्मक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असल्याचे सांगितले. सुरक्षित वातावरणाची जबाबदारी केवळ महिलांची किंवा तक्रार समितीची न मानता संपूर्ण संस्थेची मानली पाहिजे असेही त्या म्हणाल्या. त्यामध्ये लैंगिक छळाबाबत शून्य सहिष्णुता धोरण, निष्पक्ष व सक्षम अंतर्गत तक्रार समिती, आणि लिंग संवेदनशीलता प्रशिक्षण असणे गरजेचे आहे. कायदेशीर अनुपालनापेक्षा संस्थात्मक नैतिकता आणि उत्तरदायित्व अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


या राष्ट्रीय परिसंवादाच्या प्रथम सत्रामध्ये संसाधन व्यक्ती म्हणून डॉ. दिलीप चव्हाण, वरिष्ठ  प्राध्यापक, भाषा, साहित्य व संस्कृती अध्ययन प्रशाला, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी "एकविसाव्या शतकातील महिला नेतृत्व :आव्हाने आणि संधी" या विषयावर आपले विचार मांडले.

महिला नेतृत्वाचे बदलती व्याप्ती आणि आव्हाने यावर भाष्य करताना त्यांनी सामाजिक व सांस्कृतिक पूर्वग्रह कुटुंब आणि करिअर यांचा समतोल राखणे आणि नेतृत्वाच्या संधीमधील असमानता तसेच डिजिटल युगातील आव्हाने यावर त्यांनी ऊहापोह केला. तसेच महिलांना संधी मिळाल्यास त्या केवळ स्वतःचा विकास घडवत नाहीत तर संस्था, समाज आणि अर्थव्यवस्थेला ही नवी दिशा देतात असे सांगितले. या सत्राच्या अध्यक्षस्थान मा. प्राचार्य डॉ. चंद्राणि बागडी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज इचलकरंजी यांनी भूषविले. भाषणात बोलताना त्यांनी सुरक्षित कार्यस्थळाचा अभाव महिला नेतृत्वाच्या विकासाला गंभीरपणे बाधित करतो. त्यामुळे POSH सारख्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाचे ठरते असे सांगितले.

या परिसंवादाच्या विषयाच्या अनुषंगाने विविध महाविद्यालयातून अनेक शोधनिबंध सादर करण्यात आले. या राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष डॉ. प्रभा पाटील यांनी केले. समन्वयक म्हणून प्रा. पूजा पारिषवाड यांनी काम पाहिले. परिसंवाद यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ माननीय कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय एस के खाडे यांचे मार्गदर्शन लाभले. अंतर्गत गुणवत्ता कक्षचे समन्वयक डॉ. दीपक कुंभार तसेच डॉ. रूपाली सांबारे, डॉ.पद्मश्री वाघमारे, डॉ. वैशाली ढोबळे डॉ. सरिता कुंभार, डॉ. सारिका पाटील, डॉ. रिता रॉड्रिक्स, डॉ. अंजली उबाळे,डॉ. अर्चना नंदगावे,डॉ. स्नेहल लिंग्रस, पद्मा पाटील, स्वप्निल जगदाळे, श्रद्धा बरगाले, डॉ. संदीप गावडे, डॉ. संदीप पाटील यांचे बहुमोल सहकार्य लाभले. प्रा. चेतन पाटील आणि बी.सी.ए विभागातील प्राध्यापक या सर्वांचे सहकार्य तांत्रिक सत्रासाठी लाभले.




"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."
– Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe
Shri. Swami Vivekanand Shikshan Sanstha's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji.
INTERNAL COMPLAINTS COMMITTEE & WOMEN EMPOWERMENT CELL
In Collaboration with IQAC (2026-27)
AN ONLINE NATIONAL SYMPOSIUM on
WOMEN'S LEADERSHIP, EMPOWERMENT, AND INCLUSIVITY
Date: 30th July, 2026
Time: 10.00 a.m. to 3.00 p.m.
Dnyanjyoti Late. Prin. Shubhangitai Gawade
Chief Guest
Dr. Shruti Joshi
I/C Principal, A. R. Patil Kanya Mahavidyalay, Ichalkaranji
Keynote Speaker
Dr. Pooja Narwadkar
Prin. Bharati Vidypeeth's New Law College, Sangali
In Remembrance of
Hon'ble Late
Prin. Shubhangi Gawade
54th Birth Anniversary
Resource Person:
Dr. Dilip Chavan
Sr. Professor of English, Nanded
Organizer
Prof. (Dr.) S. K. Khade
Principal, D. K. A. S. C. College, Ichalkaranji
Symposium Coordinator
Mrs. Pooja Parishwad
Head, Department of Commerce
Symposium Convener
Dr. Prabha Patil
Presiding Officer, Internal Complaint Committee
Organizer
Dr. Dipak Kumbhar
Coordinator, IQAC


1:25 PM | guv-amkr-qpe
suhani patil
39
Dilip Chavan
suhani patil
Dr. Cha...
Sarika Patil
Laxmi Mahajan
Priyanka Kamble
deepak kumbhar
Seminar Section, DKASC Co...
30 others
Pooja Parishwad
People
Mute all
Add people
Anjali Ubale
Archana Nandagave
ARCHANA PATIL
BARGALE SHRADHA
Chhaya Mole
deepak kumbhar
Meeting host
Dilip Chavan
Dr. Chandrani S. Bagadi
Search
ENG IN
13:25
30-07-2026